# जाहीर सुचना

सर्व संबंधीतांना या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील जुन्या व वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील निळीपूररेषा ते लाल पूररेषा व लाल पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामंध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यासाठीच्या प्रस्तावास मिळालेल्या शासन मंजूरीनुसार अधिमुल्य आकारणी करण्यात येऊन ना-विकास जमीन वापर विभागामंध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३७ (२) नुसार शासनाकडून अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वी फेरबदल प्रस्तावातील ना-विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करावयाच्या जागेच्या संबंधित जमिन मालकांनी चालु वर्षातील बाजारमुल्य दर तक्त्यानुसार परिगणीत होणा-या रक्कमेच्या ५% दराने येणारी रक्कम अधिमुल्य म्हणून भरणा करणे बंधनकारक आहे. उपरोक्त रकमेचा भरणा करून चलनांची प्रत सादर केल्यानंतरच फेरबदलाची अधिसूंचना शासनाकडून निर्गमित करण्यात येते. ज्या मिळकतधारकांनी महानगरपालिकेकडे अधिमुल्य भरणा केला आहे. अशा मिळकतधारकांचे ना विकास वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१८१५।४२८।प्र.क्र.१३८।१५।नवि-१३, दि. २०।०१।२०२१ नुसार शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींस अधिन राहुन रहिवास विभागात समाविष्ठ केलेले आहे. तसेच “उक्त प्रस्तावित फेरबदलाखालील जमिनीपैकी अधिमुल्य भरणा न केलेल्या व उक्त अधिनियमाचे कलम ३७ (२) अन्वये अंतिम मान्यता न दिलेल्या उर्वरीत जमिनीबाबत दि. ०८।०३।२०२१ पर्यंत जर संबंधित जमीन मालकांनी अधिमुल्य रक्कम भरणा केली नाही, तर असे क्षेत्र उक्त फेरबदलाच्या प्रक्रियेतुन वगळण्यात आल्याचे व शेती विभागात पुर्ववत समाविष्ठ असल्याचे समजणेत येईल.” याप्रमाणे नमूद केलेले आहे.

तरी या जाहीर सुचनेव्दारे सर्व संबंधीत मिळकतधारकांना कळविणेत येते की, शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१८१५।४२८।प्र.क्र.१३८।१५।नवि-१३, दि. २०।०१।२०२१ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ०८।०३।२०२१ पर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात आपले मिळकती संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांसह विहीत नमुन्यात अर्ज दाखल करुन अधिमुल्य जमा करणेची कार्यवाही करण्यात यावी. या विषयाबाबत भविष्यात कोणतीही मुदत वाढवुन देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ – पिंपरी, पुणे

दिनांक- ११ ।२।२०२१

जाहिरात क्रमांक ८४३

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे-४११०१८.

(टिपः- सदर सुचना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)

# <u>जाहीर सुचना</u>

सर्व संबंधीतांना या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील जुन्या व वाढीव क्षेत्राच्या हद्दीतील निळीपूररेषा ते लाल पूररेषा व लाल पूर रेषेबाहेरील ना-विकास जमीन वापर विभागामंध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यासाठीच्या प्रस्तावास मिळालेल्या शासन मंजूरीनुसार अधिमुल्य आकारणी करण्यात येऊन ना-विकास जमीन वापर विभागामंध्ये दर्शविलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ३७ (२) नुसार शासनाकडून अधिसूचना निर्गमित करण्यापूर्वी फेरबदल प्रस्तावातील ना-विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करावयाच्या जागेच्या संबंधित जमिन मालकांनी चालु वर्षातील बाजारमुल्य दर तक्त्यानुसार परिगणीत होणा-या रक्कमेच्या ५% दराने येणारी रक्कम अधिमुल्य म्हणून भरणा करणे बंधनकारक आहे. उपरोक्त रकमेचा भरणा करून चलनांची प्रत सादर केल्यानंतरच फेरबदलाची अधिसूंचना शासनाकडून निर्गमित करण्यात येते. ज्या मिळकतधारकांनी महानगरपालिकेकडे अधिमुल्य भरणा केला आहे. अशा मिळकतधारकांचे ना विकास वापर विभागामध्ये दर्शविलेले क्षेत्र शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१८१५।४२८।प्र.क्र.१३८।१५।नवि-१३, दि. २०।०१।२०२१ नुसार शासन निर्णयात नमूद केलेल्या अटींस अधिन राहुन रहिवास विभागात समाविष्ठ केलेले आहे. तसेच "उक्त प्रस्तावित फेरबदलाखालील जमिनीपैकी अधिमुल्य भरणा न केलेल्या व उक्त अधिनियमाचे कलम ३७ (२) अन्वये अंतिम मान्यता न दिलेल्या उर्वरीत जमिनीबाबत दि. ०८।०३।२०२१ पर्यंत जर संबंधित जमीन मालकांनी अधिमुल्य रक्कम भरणा केली नाही, तर असे क्षेत्र उक्त फेरबदलाच्या प्रक्रियेतुन वगळण्यात आल्याचे व शेती विभागात पुर्ववत समाविष्ठ असल्याचे समजणेत येईल." याप्रमाणे नमूद केलेले आहे.

तरी या जाहीर सुचनेव्दारे सर्व संबंधीत मिळकतधारकांना कळविणेत येते की, शासन अधिसुचना क्र. टिपीएस-१८१५।४२८।प्र.क्र.१३८।१५।नवि-१३, दि. २०।०१।२०२१ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ०८।०३।२०२१ पर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात आपले मिळकती संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांसह विहीत नमुन्यात अर्ज दाखल करुन अधिमुल्य जमा करणेची कार्यवाही करण्यात यावी. या विषयाबाबत भविष्यात कोणतीही मुदत वाढवुन देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्थळ – पिंपरी, पुणे

दिनांक- ११ ।२।२०२१

जाहिरात क्रमांक ७४३

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे-४११०१८.

(टिप:- सदर सुचना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या <u>www.pcmcindia.gov.in</u> या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)